**शपथेवर पुढील उर्वरीत उलटतपास श्री. जयपाल वकील तक्रारदारातर्फे:–**

१२. मी सामनेवाला संस्थमध्ये दि.३०/०७/२०१० रोजी रूजु झालो. मी पुर्वी आदीवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था देवाळा येथे व्यवस्थापक म्हणुन कार्यरत होतो व त्यानंतर मला सामनेवाला क्रं.२ चा अतीरीक्त कार्यभार व्यवस्थापक म्हणुन माझेकडे सोपविण्यात आला होता. अंदाजे दोन ते अडीच वर्ष सामनेवाला क्रं.२ चा अतीरीक्त कार्यभार माझेकडे होता. माझे नंतर सामनेवाला क्रं.२ पतसंस्थेचा कार्यभार श्री. वाय.बि.चांदेकर यांचे होता. मी चांदेकर यांना सामनेवाला क्रं.२ चा संस्थेचा पदभार लेखी दिला आहे. मी चांदेकर यांच्या सहया ओळखत नाही. माझे कडून पदभार स्वीकारतांना चांदेकर यांनी माझे समोर सहया केल्या होत्या. नि.यु.४२ आता मला दाखविला त्यावर वाय.बि. चांदेकर यांची सही आहे.

१३. मी सामनेवाला क्रं.२ संस्थेमध्ये कार्यरत असतांना सन,२०१०–२०११ साली कास्त्कार लोकांना पिक कर्जाचा वाटप करण्यात आले होते. हे मला माहिती नाही की, २०१०–२०११ ची कास्तकार यांनी घेतलेल्या कर्ज धारकाची यादी प्रशासक यांनी तक्रारकर्त्याला दिली होती. आता मला नि.४० वरील कर्जधारकाची यादी मला दाखविली सदर यादी तीच आहे किंवा कसे आता मी सांगु शकत नाही. तक्रारदार सामनेवाला क्रं.२ चा व्यवस्थापक असतांना त्याने कोणत्या कास्तकार लोकांना पिक कर्ज दिले होते त्यांची यादी मी पाहिती नव्हती. मी पदभार घेतला त्यावेळी पिक कर्ज धारकाची कर्ज खतावणी नोंदवहिला नोंद उपलब्ध होती. हे म्हणणे खरे आहे की कर्ज खतावणी नोंदवहीमधे नोंदी असलेल्या कास्तकांरांना कर्जाचे वाटप झालेले होते. हे म्हणणे खरे आहे की, थकबाकी असलेल्या कास्तकांरांना पुन्हा कर्जाचे वाटप केले जात नाही असा नियम आहे.

तथाकथीत अफरातफर केलेली रक्कम तक्रारदाराने बँकेत जमा केलेली नसल्याबाबत पासबुक किंवा खाते उतारा अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, कास्तकार कधी कधी प्रत्यक्षरित्या बँकेत कर्जाचा हप्ता भरतात. हे म्हणणे खरे आहे की, बँकेतुन तशी पावती दिली जाते व नंतर ती पावती संस्थेच्या रेकॉर्डला जमा केली जाते. हे म्हणणे खरे आहे की, व्यवस्थापक सुध्दा कास्तकाराने भरलेल्या कर्जाच्या हप्त्याच्या रक्कमा बँकेत जमा करतात व तशी पावती बँकेकडून घेउन संस्थेच्या रोकड पुस्तकात त्याची नोंद घेतली जाते.

प्रश्न :– न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे तुंम्ही सन,२००९ ते२०१० या काळातील संपुर्ण रोकड वहिचे रेकॉर्ड दाखल केलेले नाही.

उत्तर – संस्थे मध्ये उपलब्ध असलेले २००९–२०१० चे सर्व रेकॉर्ड जमा केलेले आहे. व काही रेकॉर्ड राजुरा पोलिस स्टेशन येथे जमा आहे.

१४. मला माहिती नाही की, दि.१७/८/२०१५ रोजी तक्रारदाराविरूध्द दाखल केलेल्या प्रकरणामध्ये दि.१७/८/२०१५ रोजी न्यायनिर्णय कोर्टाने दिला आहे. नि.यु.६५ वरील न्यायनिर्णय आता मला दाखविला. हे म्हणणे खरे आहे की, तक्रार दाराला न्यायनिर्णयाव्दारे निर्दोश मुक्तता केली आहे. हे म्हणणे खरे आहे की,सदर न्यायनिर्णयामध्ये अपील कालावधी नंतर जप्त मुद्देमाल नष्ट करण्याचे निर्देश दिलेले आहे. फौजदार केसमध्ये पोलीसांनी मुद्देमाल जमा केला होता किंवा कसे याबाबत मला माहिती नाही.

१५. तक्रार कर्त्याने संयुक्त नि रू.३,३६,४२०/– हा तालुका देखरेख सहकारी संस्था राजुरा यांचेकडे पगारापोटी जमा केला किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. दि.१७/६/२०१० रोजी रक्कम रूपये, ३०,०००/– व दि.२१/०६/२०१०

रू.७०,०००/– हे सामनेवाला क्रं.१ च्या राजुरा येथील शाखेत जमा केले होते किंवा कसे हे मला माहिती नाही. हे मला माहिती नाही की तक्रार कर्त्याने दिलेल्या अर्जाप्रमाणे त्याने बँकेत जमा केलेल्या पटनी पावत्या सामनेवाला गै.अ.क्रं.२ कडून त्याला देण्यात आलेल्या नाही. सामनेवाला क्रं.१ ला जिल्हा उपनिबंधकांनी तक्रारकर्त्याने मागणी केल्याप्रमाणे पावत्या देण्याचे निर्देश दिले होते याबाबत मला माहिती नाही.

१६. आता मला नि.यु.२८ वरील पंचनामा मला दाखविला सदर पंचनाम मी स्वत: लिहीला नाही. सदर पंचनामा मुख्य लिपीक श्री.एम.एम.खोंड यांनी लिहिलेला आहे. मी सामनेवाला क्रं.२ मध्ये कार्यरत असतांना दि.१/४/२०१० ते ३१/०३/२०११ या कालावधीचे वार्षिक लेखापरीक्षण झाले होते. हे म्हणणे खरे आहे की, २०१०–२०११ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणाची प्रत अभिलेखावर सादर केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मागील शिल्लक व अखेरची शिल्लक हे अकांउटींग प्रमाणे वेगवेगळया हेड मध्ये येतात.

१७. मी माझे शपथपत्रात संस्थेचा रेकॉर्ड हा गडचांदुर येथील सि.डि.सि.सि.बँकेच्या निरीक्षकाच्या कॅबिनमध्ये पडलेला होता असे सांगीतले आहे.

प्रश्न – सदर रेकॉर्ड हा बँकेच्या हॉल मध्ये पडलेला होता का निरीक्षकाच्या कॅबिनमधये पडलेला होता.

उत्तर – बँकेचा हॉल व निरीक्षकाची कॅबिन एकच आहे. बँकेच्या हॉल मध्ये निरीक्षकाला बसण्यासाठी वेगळे वेगळे कॅबिन तयार केले आहे.

१८. मला सांगता येणार नाही की पंचनामा करतेवेळी निरीक्षकाच्या कॅबिनमध्ये रेकॉर्ड पडलेला असल्यामुळे प्रथमता सदर कॅबिन सिलबंद करण्यात आले.

निरीक्षकाची कॅबिन सिल केली होती किंवा कसे याबाबत मी शहानिशा केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझे समक्ष निरीक्षकाचे कॅबिनचे सिल वैगेरे काढले नव्हते. पंचनामा करण्यापुर्वी तक्रारकर्त्यास माहिती देण्यात आली होती किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, तक्रारदार हजर नव्हता. पंचनामा करतेवेळी मी स्वत:, तुपट साहेब, खोंड, सरपाते, निब्रड, पवार, जोगी, वनकर इतके लोकं हजर होते. आता मला नि.२८ वरील पंचनामावरील मी नमुद केलेला रिमार्क मला दाखविण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्यामध्ये पंच साक्षदार कोण होते याबाबत नमुद केलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, बॅंकेच्या हॉलमध्ये रेकॉर्ड हा अस्ताव्यस्त पडलेला होता असे माझे शपथपत्रात कुठेही नमुद केलेले नाही. आता मला नि.सि.६४ वरील पान क्रं.८९, ९०, व ९१ मला दाखविले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर नोंद घेणा–याची सही नाही व त्यावर संस्थेच्या अध्यक्ष व सचिवानी प्रमाणीत केलेले नाही. हे मला माहिती नाही की, दि.२/८/०१० रोजी तक्रार कर्त्याने सि.डि.सि.सि. बॅंक शाखा गडचांदुर यांचेकडे रेकॉर्ड व रक्कम मिळणेकरीता अर्ज दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की, तक्रारकर्ता हा निळया बॅगमध्ये संस्थेचे रेकॉर्ड व रक्कम घेउन गेला होता व त्यानी ते निरीक्षक जोगी यांचे कॅबिनमध्ये ठेवले होते.हे म्हणणे खरे आहे की, पंचनामा मध्ये रककमेचा व बॅगचा कुठेही उल्लेख नाही. साक्षदार स्वत: सांगतो की, रक्कम त्यावेळी आढळुन आली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी तक्रारकर्त्या विरूध्द खोटी साक्ष देत आहे.

१९. तक्रार कर्त्याने केलेल्या तथाकथीत अफरातफरी बाबत सचिव तुपट यांनी सामनेवाला क्रं.१ कडे अहवाल सादर केला होता किंवा कसे याबाबत मला माहिती नाही. सहा. निबंधक हे सामनेवाल क्रं.१ संस्थेचे सभासद सचिव असते. हे म्हणणे खरे

आहे की, संपुर्ण राजुरा तालुका अंतर्गत येणा–या सहकारी संस्थेवर त्यांचे देखरेख व नियंत्रण असते. हे म्हणणे खरे आहे की, सदर तालुक्याचे संपुर्ण कर्मचा–यावर सुध्दा त्यांचे नियंत्रण व देखरेख असते. हे म्हणणे खरे आहे की, सहा.निबंधक हा सहकारी संस्थेमध्ये तालुक्याचा प्रमुख असतो. हे म्हणणे खरे नाही की, सहायक निबंधक यांनी तक्रार कर्त्याविरूध्द दिलेला रिपोर्ट हा खोटा ठरू नये म्हणुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास काही नाही.**

**माझे समक्ष**

दि.१६/०१/२०२६

Sd/–

(अ.दा तिडके,)
न्यायाधीश,
कामगार न्यायालय, चंद्रपुर